महत्त्वाचे

देवतवाल यांची नियुक्ती

औरंगाबाद: भारतीय जनता युवा मोर्चाच्या पद्मपुरा मंडळ अध्यक्षपदी बाळू नंदकुमार देवतवाल यांची नियुक्ती करण्यात आली. युवा मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष सचिन झवेरी यांनी ही नियुक्ती केली.

मगरे यांची नियुक्ती

औरंगाबाद : शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोशल मीडिया अध्यक्षपदी विलास सुदाम मगरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहर कार्याध्यक्ष ख्वाजा शरफोद्दीन मुल्ला यांनी त्यांना नियुक्तीपत्र दिले.

पठाडे यांना पीएच.डी.

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने प्रा. जयनाथ माणिकराव पठाडे यांना लोकप्रशासन विषयामध्ये पीएच.डी. प्रदान केली आहे. प्राचार्य डॉ. व्ही.जी. सानप यांच्या मार्गदर्शनाखाली 'महाराष्ट्रातील फलोत्पादन विकास कार्यक्रम- संघटना कार्यपद्धती आणि ग्रामीण विकासातील भूमिका: विशेष संदर्भ मराठवाडा विभाग' या विषयावर त्यांनी शोधप्रबंध विद्यापीठास सादर केला.

इंगळे यांची नियुक्ती

औरंगाबाद : शहर जिल्हा काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाच्या औरंगाबाद पूर्व विधानसभा अध्यक्षपदी विशाल ओमप्रकाश इंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र दळवी यांच्या आदेशानुसार शहराध्यक्ष बाबा तायडे यांनी ही नियुक्ती केली.

८० दात्यांचे रक्तदान

औरंगाबाद : हॅप्पी क्लब औरंगाबादतर्फे नवाबपुरा येथे रक्तदान शिबीर घेण्यात आले. यामध्ये ८० दात्यांनी रक्तदान केले. यावेळी अनिल लुणिया, मसीहुद्दीन सिद्दीकी, डॉ. विनित जगताप, हॅप्पी क्लबचे अध्यक्ष शेख फय्याज, शाहरुख खान, तबरेज शेख, अहसान जिबरान आदी उपस्थित होते.

२३ नोव्हेंबरला संप

औरंगाबाद : ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्टस् ॲण्ड ड्रगिस्टस् (एआयओसीडी) तर्फे केंद्र सरकारने ई-फार्मसीच्या माध्यमातून औषध विक्रीच्या मंजुरीला विरोध करण्यासाठी २३ नोव्हेंबर रोजी देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. एआयओसीडीचे अध्यक्ष जे. एस. शिंदे म्हणाले की, सामान्य जनतेच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी संपावर जाण्याशिवाय दुसरा कोणताच पर्याय नाही.

मार्गदर्शन शिबीर

औरंगाबाद: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील प्रीआयएएस मार्गदर्शन केंद्रात राष्ट्रीय-राज्य पात्रता चाचणी अर्थात नेट-सेट मार्गदर्शन वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. अनुसूचित जाती-जमाती व मागास विद्यार्थ्यांनी केंद्रात नावनोंदणी करण्यासाठी केंद्राच्या संचालकांशी संपर्क साधण्याचे आवाहन संचालक डॉ. यशवंत खिल्लारे यांनी केले आहे.

रोझ सोसायटीचा उपक्रम

औरंगाबाद: पुण्यात कार्यरत असलेल्या 'महाराष्ट्र रोझ सोसायटी' संस्थेच्या सदस्यांनी औरंगाबादच्या सीटीआर कंपनीच्या जलशुद्धीकरण प्रकल्पाला भेट दिली. अल्पभूधारक शेतकऱ्यांना गुलाब शेती करण्यासाठी ही संस्था प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करते.

विद्यापीठात चर्चासत्र

औरंगाबाद: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील उद्योग संवाद कक्ष व क्वीक हेल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सेक्युरिटीवर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आल्याची माहिती ओएसडी निवृत्ती गजभारे यांनी दिली. विद्यापीठातील नाट्यगृहात पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन सोमवारी (दि.२१) दुपारी १२ वाजता होईल.

नागरिकांना चहा नाश्ता

औरंगाबाद : मुकुंदवाडी येथील बँक ऑफ बडोदा येथे नोटा बदली व पैसे काढण्यासाठी रांगेत उभ्या राहिलेल्या नागरिकांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने वडापाव, चहा नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी मोतीलाल जगताप, रुपचंद ठाले, गंगाराम कापसे, आक्रूर वाघ,सखाहरी जगताप, शिवा जगताप, शैलेश भालेराव, प्रशांत जगताप, गणेश तुपे, विजय गाडेकर, लक्ष्मण आहेर, इंगोले, अख्तर पटेल, सूर्यकांत जगताप, प्रकाश जगताप, राजपूत आदींची उपस्थिती होती.

कामाला गती : नवा प्रस्ताव दोन दिवसांत पाठवणार

विमानतळ विस्तार; ६०० कोटींचा खर्च

औरंगाबाद : विमानतळ विस्तारीकरणासाठी थोडे थोडके नाही तर तब्बल सहाशे कोटी रुपये लागणार आहेत. यासंदर्भातील नवा प्रस्ताव येत्या दोन दिवसांत शासनाकडे पाठविण्यात येईल, असे उपविभागीय अधिकारी शशिकांत हदगल यांनी सांगितले.

४ ऑक्टोबर रोजी औरंगाबादेत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत विमानतळ विस्तारीकरणासाठी दोनशे कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती व या कामाला गती देण्याच्या सूचना त्यांच्याकडून वारंवार येत होत्या. त्यानुसार काल मंत्रालयात पुन्हा महत्त्वाची बैठक झाली व नव्याने प्रस्ताव दाखल करण्याचे ठरले.

विमानतळ विस्तारीकरणासाठी १८२ एकर भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यासाठी अंदाजे सहाशे कोटींहून अधिक रक्कम लागणार आहे. यात सुमारे १३०० मालमत्तांवर हातोडा पडण्याची शक्यता आहे. जिल्हा प्रशासनाने विमानतळ विस्तारीकरणासाठी यापूर्वी सर्वेक्षण केलेले आहे. १८२ एकर जमीन संपादनासाठी विमानतळ परिसरातील ५२ शेतकऱ्यांची ८१ एकर जमीन, त्या भागात अकृषक करण्यात आलेले ६३५ प्लॉट आणि सिडकोच्या ३१६ मालमत्ता, मूर्तिजापूर आणि मुकुंदवाडीतील म्हाडाच्या ३५० मालमत्ता, आणि चिकलठाण्यातील ६३० निवासी घरांचे संपादन केले जाणार आहे. नवीन भूसंपादन कायद्यानुसार मोबदला देण्याकरिता ६०० कोटींपेक्षा अधिक लागणार आहेत. तसेच दोन एकर, मनपाची १५ गुंठे आणि सिडकोची ४३ गुंठे जमिनीचे संपादन होणार आहे. नव्याने तयार केल्या जाणाऱ्या प्रस्तावामध्ये या मालमत्तांचा समावेश केला जाणार आहे.

हदगल यांनी सांगितले की, विमानतळ विस्तारीकरणाचा १८२ एकर जमिनीच्या संपादनाचा प्रस्ताव सरकारकडे दोन दिवसांत सादर करण्यात येईल. सिडको, म्हाडा,चिकलठाणा, मुकुंदवाडी, मूर्तिजापूर येथील मालमत्तांसह शेतजमिनीचे संपादन केले जाईल आणि यासाठी सुमारे सहाशे कोटींहून अधिक निधी लागेल.

अधिकाऱ्यांची मुंबईत बैठक...

कालच मुंबईत विमानतळ विस्तारीकरणाच्या प्रश्नावर उच्च पदस्थ अधिकाऱ्यांची बैठक झाली होती. त्यामुळे आता या प्रलंबित प्रश्नाला गती मिळाली आहे. कालच्या बैठकीस औरंगाबादचे विभागीय आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, जिल्हाधिकारी डॉ. निधी पांडे, सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव शामलाल गोयल, वनविभागाचे सचिव व भूसंपादनाचे समन्वयक विकास खारगे, विमानतळ प्राधिकरणाच्या उपसंचालक हेमलता आर्दीची उपस्थिती होती.

मोर्चा... इंडियन मेडिकल असोसिएशन संघटनेतर्फे काढण्यात आलेल्या लक्षवेधी मोर्चात सहभागी डॉक्टर.

डॉक्टरांचा लक्षवेधी मोर्चा

औरंगाबाद : सरकारने 'एमसीआय' बरखास्त करून त्याऐवजी नॅशनल मेडिकल कमिशन (एनएमसी) स्थापन करण्याचा घाट घातला आहे. याचा निषेध करण्यासाठी डॉक्टरांच्या इंडियन मेडिकल असोसिएशनने संस्थेचे कार्यालय ते निराला बाजार असा लक्षवेधी मोर्चा काढला. या मोर्चामध्ये विविध रुग्णालयांतील डॉक्टर सहभागी झाले होते.

केंद्र सरकारने एमसीआय बरखास्त करत नॅशनल मेडिकल कमिशन आणण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. याला विरोध करण्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनने देशव्यापी सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला होता. यानुसार औरंगाबाद शहरातील आयएमएच्या सदस्यांनी विवेकानंद महाविद्यालयाच्या परिसरातील संस्थेच्या कार्यालयापासून निराला बाजारपर्यंत हातात फलक धरत मोर्चा काढला. मोर्चा झाल्यानंतर डॉक्टरांनी तासभर धरणे देत पोलीस आयुक्तांना मागण्यांचे निवेदन दिले.

'आयएमए'च्या मागण्या

जनहितासाठी नॅशनल मेडिकल कमिशन रद्द करणे, वैद्यकीय व्यावसायिकांची स्वायत्ता अबाधित ठेवून एमसीआयमध्ये योग्य ते बदल करणे, छोटे हॉस्पिटल व सिंगल डॉक्टर हॉस्पिटलला क्लिनिकल इस्टॅब्लिशमेंटमधून वगळणे, पीसीपीएनडीटी कायद्यात बदल करणे आणि डॉक्टर्स व हॉस्पिटल्ससाठी केंद्रीय सुरक्षा कायदा करणे.

हैं तय्यार हम...

Aurangabad Marathon
A LOKMAT INITIATIVE 21km
11 Dec 2016

मी धावणार आरोग्यासाठी

'लोकमत'तर्फे मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या भव्य दिव्य स्पर्धेत आपणही सहभागी होणार आहोत. निरोगी आरोग्यासाठी व्यायाम हाच एकमेव उपाय आहे. वयाच्या ८५ व्या वर्षीही आपण मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. मागील ५० वर्षांपासून मी नियमितपणे प्रत्येक मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होतो. पेपर कंपोझिंग करताना मला धावण्याचा छंद लागला. यानंतर आरोग्य उत्तम राहावे म्हणून नियमितपणे धावण्याची सवयच लावून घेतली. एड्स जनजागृतीसाठी अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. या कार्यक्रमांमध्येही आपण अनेकदा सहभाग घेतला. धावण्याच्या स्पर्धेत भाग घेऊन जनजागृती केली.

-कृष्णराव रंगनाथराव चौधरी (किनगावकर)

लायन्स क्लब ऑफ औरंगाबाद, रॉयल-३२३ एच-२ ...

(डावीकडून) संकेत भारुका, हर्षदीप अग्रवाल, मनोज कोठारी, अनिल काला, अनुज चांडक, सचिन करवा, मनोज बोरा (माजाजी), ओम अग्रवाल, पारस ओस्तवाल, सचिन ओस्तवाल, नंदकिशोर वर्मा, महेंद्र चोपडा, गौतम जैन, प्रमोद डेरे, जितेंद्र गादिया, डॉ. प्रमोद हिवरेकर, अनिल लुनिया व दिनेश मुथा.

नाव नोंदणी व सहभागासाठी www.mycitymarathon.com वर ऑनलाईन प्रवेशिका भरु शकता किंवा मॅरेथॉनची प्रवेशिका छोटी जाहिरात कार्यालय, लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ०२४-६६०४५०२

परीक्षा शुल्क माफ करण्याची मागणी

औरंगाबाद : नोटाबंदीचा त्रास सर्वसामान्य नागरिकांप्रमाणे विद्यार्थ्यांना होत आहे. यामुळे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करावे, अशी मागणी आ.सतीश चव्हाण, आ.कपिल पाटील, आ.सतेज पाटील यांनी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्याकडे केली आहे.

शासनाने दहावी व बारावीच्या परीक्षांचे शुल्क भरण्यास विद्यार्थ्यांना मुदतवाढ दिली आहे. मात्र, जुन्या नोटांमुळे परीक्षा शुल्क भरताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. नोटाबंदीमुळे शेतकरी, शेतमजूर, कामगार वर्गाची मोठी अडचण निर्माण झाली आहे. यंदा समाधानकारक पाऊस झाला तरी शेतकऱ्यांच्या हातात अजून पैसा आलेला नाही. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्यांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या सर्वाधिक असल्यामुळे परीक्षा शुल्कदेखील माफ करावे, अशी मागणी आ.सतीश चव्हाण यांनी विनोद तावडे यांच्याकडे केली.

१८ नोव्हेंबर : ध्येयवेड्या सेवाव्रतींचा गौरव सोहळा

'लोकमत सखी सन्मान' पुरस्काराचे शुक्रवारी वितरण

औरंगाबाद : प्रतिकूल परिस्थितीशी झगडून सामान्य ते असामान्य असा प्रवास करणाऱ्या रणरागिणींचा सन्मान करणारा 'लोकमत सखी सन्मान पुरस्कार' सोहळा उद्या (दि.१८) सायंकाळी ५ वा. लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद येथे होत आहे. भाग्यविजय हे कार्यक्रमाचे पॉवर्डबाय स्पॉन्सर्स असून लिटिल एन्जल इंग्लिश स्कूल हे असोसिएट स्पॉन्सर्स आहेत.

औरंगाबाद जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातील ध्येयवेड्या सेवाव्रतींना मानाचा मुजरा करणारा हा गौरव सोहळा. सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, क्रीडा, शौर्य, उद्योग-व्यवसाय, साहित्य- संस्कृती अशा प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना या पुरस्काराद्वारे गौरविण्यात येणार आहे.

ध्येयवेड्या अनेकींना लढण्याचे बळ देणाऱ्या आणि अनेकींसाठी आदर्श ठरणाऱ्या एका ज्येष्ठ- श्रेष्ठ व्यक्ति मत्त्वाला या सोहळ्यात 'जीवन गौरव' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल. औरंगाबाद जिल्ह्याप्रमाणेच मराठवाड्यात उत्तुंग कार्य करणाऱ्या सखींचाही या कार्यक्रमात गौरव होईल. प्रवेश मागील गेटने देण्यात येईल. स्वराज हे या कार्यक्रमाचे म्युझिक पार्टनर आहेत. संदीप साऊंडस् हे साऊंड पार्टनर आहेत.

योगिता गोडबोले यांची मुख्य उपस्थिती

'कुंजवनाची सुंदर राणी..' किंवा 'गोऱ्या गोऱ्या गालावरी...' यासारख्या गाण्यांनी मराठी हृदयांना साद घालणाऱ्या सुप्रसिद्ध गायिका योगिता गोडबोले या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असणार आहेत. त्यांच्या आवाजात बहारदार गाणी ऐकण्याची संधी सखींना मिळणार आहे. हिंदी- मराठी गाण्यांच्या सुरेल मैफिलीने या पुरस्कार सोहळ्याचा आनंद द्विगुणित होईल.

लोकमत सखी मंच

न्यायमूर्ती के.एल. वडणे यांचा आज शपथविधी

औरंगाबाद : मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती कालिदास लक्ष्मणराव वडणे यांचा उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून गुरुवारी (दि. १७) सकाळी १० वाजता औरंगाबाद खंडपीठात शपथविधी होणार आहे, असे मुंबई उच्च न्यायालयाचे महाप्रबंधक मंगेश पाटील आणि औरंगाबाद खंडपीठाचे प्रबंधक (प्रशासन) एच.ए. पाटील यांनी कळविले.

न्या. वडणे यांचा जन्म १२ जानेवारी १९५७ रोजी मालुंब्रा (ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद) गावात झाला. पुणे येथील आय.एल.एस. विधि महाविद्यालयातून विधि शाखेची पदवी प्राप्त केली. २००० पर्यंत उस्मानाबादच्या जिल्हा व सत्र न्यायालयात वकिली केली. १९९० ते ९६ दरम्यान त्यांनी अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून उस्मानाबाद येथे काम केले. ५ ऑक्टोबर २००० मध्ये त्यांची अतिरिक्त जिल्हा न्यायाधीशपदी नियुक्ती झाली. त्यांनी या पदावर रत्नागिरी, कोल्हापूर, हिंगोली, कराड येथे तर प्रधान जिल्हा न्यायाधीशपदावर अलिबाग येथे काम केले. २०११ ते २०१३ दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाच्या दक्षता विभागात प्रबंधक म्हणून काम केले. डिसेंबर २०१४ पर्यंत त्यांनी पुणे येथे प्रधान जिल्हा न्यायाधीश म्हणून काम पाहिले. १ जानेवारी २०१५ रोजी त्यांची अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून मुंबई उच्च न्यायालयात नियुक्ती झाली होती.

इन्स्पायर शिबीर आजपासून

औरंगाबाद : शालेय व महाविद्यालयीन जीवनातच विद्यार्थ्यांमध्ये पायाभूत संशोधनाबद्दल आकर्षण निर्माण व्हावे. विद्यार्थ्यांनी संशोधनाकडे वळावे. या उद्देशासाठी भारत सरकारच्या विज्ञान-तंत्रज्ञान विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील डी.एन.ए. बारकोडिंग सेंटरतर्फे, विद्यापीठात १७ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत 'इन्स्पायर' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. ११ वी विज्ञानमध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी या शिबिरात सहभागी होत आहेत. दहावीमध्ये किमान ९३.२ टक्के गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांची शिबिरासाठी निवड करण्यात आली आहे. या शिबिरासाठी औरंगाबाद, बीड व जालना येथील ९० मुले व ११० मुली सहभागी होत आहेत.

बालरोगतज्ज्ञांची परिषद उद्यापासून

राज्यस्तरीय आयोजन : कार्यशाळा, चर्चासत्रांची रेलचेल

औरंगाबाद : बालकांच्या आहारापासून ते आरोग्यापर्यंतची सविस्तर चर्चा, बालकांचा सर्वांगीण विकास, विविध आजार आणि त्यावरील अत्याधुनिक उपचारपद्धती असे बालकांसंबंधी अनेक विषय दि. १८ ते २० नोव्हेंबर याकाळात शहरात होणाऱ्या २७ व्या राज्यस्तरीय बालरोगतज्ज्ञांच्या 'महापेडिकॉन २०१६' या परिषदेमध्ये चर्चिले जाणार आहेत. इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्सच्या औरंगाबाद शाखेतर्फे या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

हॉटेल अजिंठा ॲम्बेसेडर येथे होणाऱ्या या परिषदेमध्ये राज्यभरातून दीड हजारपेक्षाही अधिक बालरोगतज्ज्ञ सहभागी होणार आहेत. दहा वर्षांनंतर शहरात होणाऱ्या या परिषदेत डॉ. वाय. के. आमडेकर, डॉ. नितीन शाह, डॉ. अनुपम सचदेवा, डॉ. प्रमोद जोग, डॉ. अशोक देवरारी, डॉ. जयकुमार, डॉ. जॉन मथाई, डॉ. संतोष सोन्स, डॉ. एन. के. सुब्रमण्यम, डॉ. प्रीतेश नायर आदी मार्गदर्शन करतील.

कृत्रिम श्वास, श्वसनाशी संबंधित आजार, लहान मुलांचे मेंदूविकार, लहान बाळांचे आतडे, फास्टफूडचे होणारे दुष्परिणाम, कमी वजनाच्या बाळाची काळजी यासारखे अनेक प्रश्न या परिषदेत हाताळले जातील, अशी माहिती याविषयी आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

याप्रसंगी डॉ. राजेंद्र वैद्य, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. दत्ता कदम, डॉ. जयंत तुपकरी, डॉ. राजेंद्र खडके, डॉ. केदार सावळेश्वरकर, डॉ. मंदार देशपांडे, डॉ. प्रशांत जाधव आदींसह अनेक बालरोगतज्ज्ञांची उपस्थिती होती.

◆ जलतज्ज्ञ डॉ. माधवराव चितळे हे देखील या परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत. तसेच मुंबईचे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. हरिश शेट्टी यांचे 'बालरोगतज्ज्ञ- एक कौटुंबिक सल्लागार' व 'पौगंडावस्थेतील मुला-मुलींच्या समस्या' या विषयांवर विशेष मार्गदर्शन होणार आहे.

लोकअदालतीत २३ लाखांची तडजोड

औरंगाबाद : महावितरणने घेतलेल्या लोकअदालतमध्ये वीजचोरीच्या ३७ प्रकरणांत २३ लाख ६९ हजार ४०० रुपयांची प्रकरणे तडजोड करून निकाली काढली.

वैभव प्लास्टिक उद्योग, वाळूज यांच्याकडे ८ हजार ६९ हजार ४०० रुपयांचे प्रकरण लोकअदालतमध्ये तडजोडीत निकाली काढण्यात आले. वैजापूर उपविभागातील १५ लाख रुपयांची ३६ प्रकरणे निकाली काढण्यात आली. सदर निकाल दिवाणी न्यायाधीश वरिष्ठस्तर डी. के. मोरे व वैजापूर येथील न्यायाधीश के. ए. कोटेकर यांनी दिला. यासाठी विधी अधिकारी सत्यजित पवार, कार्यकारी अभियंता प्रेमसिंग राजपूत, अतिरिक्त कार्यकारी दीपक माने, उपकार्यकारी अभियंता प्रकाश तौर, कनिष्ठ विधी अधिकारी सुनील पावडे, ॲड. केवल डोंगरे आदींनी परिश्रम घेतले.

हर्सूल येथे यात्रेनिमित्त 'घोडदौड'चा थरार

औरंगाबाद : हर्सूल येथील हरसिद्धीमातेच्या यात्रेनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम, कुस्त्यांचा फड, पशुपक्ष्यांचे प्रदर्शन आणि 'घोडदौड'ची धूम पाहून यात्रेकरूंच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

हर्सूल गाव महानगरपालिकेत आले असले तरी त्यांनी गावपणाची नाळ अद्याप लोप पावू दिली नाही. आजही येथे सर्वधर्म समभावाची भावना गावात जोपासली जाते. सर्व जाती-धर्मातील लोक यात्रोत्सवात सहभागी होताना आढळून येतात.

यात्रेत कुस्तीची दंगल अत्यंत उत्साहात पार पडली अन् दुसऱ्या दिवशी कोंबड्या, बकऱ्या, मेंढ्या, बदक तसेच विविध प्रजातीच्या जनावरांना उत्सुकतेने गावातील चिमुकल्यांसह यात्रेकरूंनी पाहिले.

घोडदौडमध्ये परभणीच्या घोड्याने क्रमांक पटकावला. एकूण १४ घोडे स्पर्धेत सहभागी झाले होते, तर दोन राऊंडमध्ये ७ घोड्यांचा एक याप्रमाणे अ- ब असे दोन गट केले होते. पहिल्या राऊंडमध्ये ७ आणि दुसऱ्या राऊंडमध्ये ७ घोडे पळविण्यात आले. शेवटचा राऊंड परभणी येथील घोड्याने पटकावून बक्षिसाचा मानकरी ठरला.

हर्सूल येथे हरसिद्धीमातेच्या यात्रेतील घोडदौड स्पर्धेतील एक थरारक क्षण.

रविराज देशमुख यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली होती. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी नगरसेवक पूनमचंद बमणे, कृषी सभापती संजय औताडे, नगरसेवक विजय औताडे, पटेल, संयोजक समितीच्या वतीने परिश्रम घेतले.